॥ ५०९४ ॥ गंगा न देखे विटाळ । तेंचि रांजणीं ही जळ ॥ १ ॥ अल्पमहदा नव्हे सरी । विटाळ तो भेद धरी ॥२॥ काय खंडिली भूमिका। वर्णा पायरिकां लोकां ॥ ३ ॥ तुका ह्मणे अग्नीविण । बीजें वेगळीं तों भिन्न ॥ ४ ॥

॥ ५०९५ ॥ जग तरि आह्मां देव । परि हे निंदितों स्वभाव ॥ १ ॥ येतो हिताचा कळवळा । पडती हातीं म्हून काळा ॥ २ ॥ नाहीं कोणी सखा । आह्मां निपराध पारिखा ॥ ३ ॥ उपक्रमें वदे । तुका वर्मासी तें भेदें ॥ ४ ॥

॥ ५०९६ ॥ समर्थाचें केलें । कोणां जाईल मोडिलें ॥ १ ॥ वांयां करावी ते उरे । खटपट सोस पुरे ॥ २ ॥ ठेविला जो ठेवा । आपुलाला तैसा खावा ॥ ३ ॥ ज्याचें त्याचे हातीं । भुंके तयाची फजिती ॥ ४ ॥ तुका ह्मणे कोटी । बाळे झाले शूळ पोटीं ॥ ५ ॥

॥ ५०९७ ॥ दुर्बळा वाणीच्या एक दोनि सिद्धि । सदैवा समाधि विश्वरूपीं ॥ १ ॥ काय त्याचें वांयां गेलें तें एक । सदा प्रेमसुख सर्वकाळ॥ २ ॥ तीर्थ देव दुरि तया भाग्यहीना । विश्व त्या सज्जना दुमदुमिलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे एक वाहाती मोळिया । भाग्यें आगळिया घरा येती ॥ ४ ॥

॥ ५०९८ ॥ परिमळें काष्ठ ताजवां तुळविलें।आणीक नांवांचीं थोडीं॥ एक तीं कांतिवें उभविलीं ढवळारें । एकाचिया कुड मेडी ॥ एक दिनरूप आणिती मोळिया । एक ते बांधोनि माडी ॥ अवघियां बाजार एकचि झाला । मांविकलीं आपुल्या पाडीं ॥ १ ॥ गुण तो सार रूपमध्यकार । अवगुण तो फार पीडीतसे ॥ २ ॥ एक गुणें आगळे असती । अमोल्य नांवांचे खडे ॥ एक समर्थ दुर्बळा घरीं । फार मोलाचे थोडे ॥ एक झगझग करिती वाळवंटीं । कोणी न पाहती तयांकडे ॥ सभाग्य संपन्न आपुलाले घरीं । मायेक दैन्य बापुडें ॥ ३ ॥ एक नामें रूपें सारिख्या असती । अनेक प्रकार याती ॥ ज्याचिया संचितें जैसें आलें पुढें । तयाची तैसीच गति ॥ एक उंचपदीं बैसोनि सुखें । दास्य करवी एका हातीं ॥ तुका म्हणे कां मानिती सुख । चुकलिया वांयां खंती ॥ ४ ॥

॥ ५०९९ ॥ नाहीं कोणी दिस जात वांयाविण । साध्य नाहीं सीण लटिकाचि ॥ १ ॥ एकाचिये माथां असावें निमित्त । नसो नाहीं हित कपाळींतें ॥ २ ॥कांहीं एक तरी बोलायाचा जागा । नेदिती बाउगा

उभा ठाकों ॥ ३ ॥ तुका ह्मणे वर्मे कळों येती कांहीं । ओळखी जे नाहीं होईल ते ॥ ४ ॥

॥ ५१०० ॥ कामातुरा भय लाज ना विचार । शरीर असार तृणतुल्य ॥ १ ॥ नवल हे लीळा करित्याचें लाघव । प्रारब्धें भाव दाखविले ॥ २ ॥ लोभालोभ एका धनाचिये ठायीं । आणिकांची सोई चाड नाहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे भूक न विचारी प्रकार । योजे तेंचि सार यथाकाळें ॥ ॥ ४ ॥

॥ ५१०१ ॥ बांधे सोडी हें तों धन्याचिये हातीं । हेंकडें गोविती आपणा बळें ॥ १ ॥ भुललियासी नाहीं देहाचा आठव । धोतऱ्यानें भाव पालटिला ॥ २ ॥ घरांत रिघावें दाराचिये सोयी । भिंतीसवें डोयी घेऊनि फोडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा गेलीं विसरोन । आतां वर्म कोण दावी यासी ॥ ४ ॥

॥ ५१०२ ॥ धीर तो कारण एकविधभाव । पतिव्रते नाहो सर्व भावें ॥ १ ॥ चातक हे जळ न पाहाती दृष्टीं । वाट पाहे कंठीं प्राण मेघा ॥ २ ॥ सूर्यविकासिनी नेघे चंद्रामृत । वाट पाहे अस्तउदयाची ॥३॥ धेनु येऊं नेदी जवळी आणिकां । आपुल्या बाळकाविण वत्सा ॥ ४ ॥ तुका ह्मणे नेम प्राणांसवें साटी । तरीच या गोष्टी विठोबाची ॥ ५ ॥

॥ ५१०३ ॥ जीव जीती जीवना संगें । मत्स्या मरण त्या वियोगें ॥ १ ॥ जया चित्तीं जैसा भाव । तयां जवळि तैसा देव ॥ २ ॥ सकळां पढिये भानु । परि त्या कमळाचें जीवनु ॥३॥ तुका ह्मणे माता । वाहे तान्हयाची चिंता ॥ ४ ॥

॥ ५१०४ ॥ मुंगीचिया घरा कोण जाय मूळ । देखोनियां गूळ धांव घाली ॥ १ ॥ याचकांविण काय खोळंबला दाता । तोचि धांवें हिता आपुलिया ॥ २ ॥ उदक अन्न काये ह्मणे मज खा ये । भुकेला तो जाय चोजवीत ॥ ३ ॥ व्याधी पिडिला धांवे वैद्याचिया घरा । दुःखाच्या परिहारा आपुलिया ॥ ४ ॥ तुका म्हणे जया आपुलें स्वहित । करणें तोचि प्रीत धरी कथे ॥ ५ ॥

॥ ५१०५ ॥ सतीचें तें घेतां वाण । बहु कठीण परिणामीं ॥ १ ॥ जिवासाटीं गौरव वाढे । आहाच जोडे तें नव्हे ॥२॥ जरि होय उघडी दृष्टि । तरि गोष्टी युद्धाच्या ॥३॥ तुका ह्मणे अंगा येतां । तरी सत्ता धैर्याची ॥४ ॥

॥ ५१०६ ॥ बरें झालीयाचे अवघे सांगाती । वाइटाचे अंतीं कोणी नाहीं ॥ १ ॥ नोहे मातापिता नोहे कांतासुत । इतरांची मात काय सांगों ॥ २ ॥ तुका ह्मणे जन दुतोंडी सावज । सांपडे सहज तिकडे धरी ॥ ३ ॥

॥ ५१०७ ॥ मदें मातलें नागवें नाचे । अनुचित वाचे बडबडी ॥ १ ॥ आतां शिकवावा कोणासी विचार । कर्म तें दुस्तर करवी धीट ॥ २ ॥ आलें अंगासी तें बळिवंत गाढें । काय वेड्यापुढें धर्मनीत ॥ ३ ॥ तुका ह्मणे कळों येईल तो भाव । अंगावरि घाव उमटतां ॥ ४ ॥

॥ ५१०८ ॥ जरी आलें राज्य मोळविक्या हातां । तरी तो मागुता व्यवसायी ॥ १ ॥ तृष्णेचीं मजुरें नेणती विसांवा । वाढें हांव हांवा काम कामीं ॥ २ ॥ वैभवाचीं सुखें नातळतां अंगा । चिंता करी भोगा विघ्न जाळी ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाहे मरणाचें भय । रक्षणउपाय करूंनिअसे ॥ ४ ॥

॥ ५१०९ ॥ कोलें भरियेली पेंट । निग्रहाचे खोटे तंट ॥ १ ॥ ऐसें माता जाणे वर्म । बाळा वाढवितां धर्म ॥ २ ॥ कामावितां लोहो कसे । तांतडीनें काम नासे ॥ ३ ॥ तुका ह्मणे खडे । देतां अक्षर तें जोडे ॥ ४ ॥

॥ ५११० ॥ जया शिरीं कारभार । बुद्धि सार तयाची ॥ १ ॥ वर्ते तैसें वर्ते जन । बहुतां गुण एकाचा ॥ २ ॥ आपणीया पाक करी । तो इतरीं सेविजे ॥ ३ ॥ तुका ह्मणे शूर राखे । गाढया वाखे सांगातें ॥ ३ ॥

॥ ५१११ ॥ पोट धालें आतां जीवनीं आवडी । पुरवावे परवडी बहुतांचे ॥ १ ॥ काय आंचवणा तांतडीचें काम । मागील तीं श्रम न पवावीं ॥ २ ॥ वाढितिया पोटीं बहु असे वाव । सांभाळितां ठाव काय वांचे ॥ ३ ॥ दाविल्यावांचूनि नाहीं कळों येत । तेथें ही दुश्चित एकपणें ॥ ४ ॥ नावेचा भार तो उदकाचे शिरीं । काय हळू भारी तये ठायीं ॥ ५ ॥ तुका म्हणे गीतीं गाऊनि गोविंद । करूं ब्रम्हानंद एकसरें ॥ ६ ॥

॥ ५११२ ॥ धनवंता घरीं । करी धनचि चाकरी ॥ १ ॥ होय बैसल्या व्यापार । न लगे सांडावेंचि घर ॥ २ ॥ रानीं वनीं द्वीपीं । असतीं तीं होतीं सोपीं ॥ ३ ॥ तुका म्हणे मोल । देतां कांहीं नव्हे खोल ॥ ४ ॥

॥ ९११३ ॥ मोक्ष देवापाशीं नाहीं । लटिक्या घाई विळवतें ॥ १ ॥ काय खरें न धरी शुद्धी । गेली बुद्धी भ्रमलें ॥ २ ॥ अहंकारास उरलें कायी । पांचांठायीं हें वांटे ॥ ३ ॥ तुका म्हणे कुंथे भारें । लटिकें खरें मानुनियां ॥ ४ ॥

॥ ९११४ ॥ फळ्याचे बडबडे चवी ना सवाद । आपुलाचि वाद आपणासी ॥ १ ॥ कोणें या शब्दाचे मरावें घसणी । अंतरें शाहाणी राहिजे हो ॥ २ ॥ गाढवाचा भुंक आइकतां कानीं । काय कोडवाणी ऐसियेचें ॥ ३ ॥ तुका म्हणे ज्यासी करावें वचन । त्याचे येती गुण अंगास ते ॥ ४ ॥

॥ ९११५ ॥ प्राक्तनाच्या योगें आळशावरी गंगा । स्नान काय जगा करूं नये ॥ १ ॥ उभी कामधेनु मांगाचे अंगणीं । तिसी काय ब्राह्मणीं वंदूं नये ॥ २ ॥ कोढियाचे हातें परिसें होय सोनें । अपवित्र ह्मणोन घेऊं नये ॥ ३ ॥ यातिहीन झाला गांवींचा मोकासी । त्याच्या वचनासी मानूं नये ॥ ४ ॥ भावारूढ तुका मुद्रा विठोबाची । न मनी तयांचीं तोंडें काळीं ॥ ५ ॥

॥ ९११६ ॥ कठिण नारळाचें अंग । बाहेरी भीतरी तें चांग ॥ १ ॥ तैसा करी कां विचार । शुद्ध कारण अंतर ॥ २ ॥ वरि कांटे फणसफळा । माजी अंतरीं जिव्हाळा ॥ ३ ॥ उंस बाहेरी कठिण काळा । माजि रसाचा जिव्हाळा ॥ ४ ॥ मिठें रूचविलें अन्न । नये सतंत कारण ॥ ५ ॥

॥ ९११७ ॥ झाडा वरपोनि खाऊनियां पाला । आठवी विठ्ठला वेळो वेळां ॥ १ ॥ वल्कलें नेसुनि टुंगा गुंडाळोनी । सांडी जवळुनी देहभान ॥ २ ॥ लोकमान वमना समान मानणें । एकांतीं राहणें विठोसाटीं ॥ ३ ॥ सहसा करूं नये प्रपंचीं सौजन्य । सेवावें अरण्य एकांतवास ॥ ४ ॥ ऐसा हा निर्धार करी जो मनाचा । तुका ह्मणे साचा पांग फिटे ॥ ५ ॥

॥ ९११८ ॥ वाघें उपदेशिला कोल्हा । सुखें खाऊं द्यावें मला ॥ १ ॥ अंतीं मरसी तें नचुके । मजही मारितोसी भुके ॥ २ ॥ येरू ह्मणे भला भला । निवाड तुझ्या तोंडें झाला ॥ ३ ॥ देह तंव जाणार । घडेल हा उपकार ॥ ४ ॥ येरू ह्मणे मनीं । ऐसें जावें समजोनि ॥ ५ ॥ गांठी पडली ठका ठका । त्याचा धर्म बोले तुका ॥ ६ ॥

॥ ५११९ ॥ ऐसा ज्याचा अनुभव । विश्वसत्य तोचि देव ॥ १ ॥ देव तयापासी असे । पाहवा दर्शनींच दिसे ॥ २ ॥ काम क्रोध नसे चित्ता । भूतीं झाली हो समता ॥ ३ ॥ तुका ह्मणे भेदा भेद । गेला समुळीं विवाद ॥ ४ ॥

॥ ५१२० ॥ ज्याचें अंतःकरण शुद्ध । त्याला करणें नलगे बोध ॥१॥ नलगे साधूचा शेजार । सुटति प्रेमाचे पाझर ॥ २ ॥ तुका ह्मणे मैलागिरी । भुजंग येती अंगावरी ॥ ३ ॥

॥ ५१२१ ॥ सर्व धर्मांतें टांकोन । मातें शरण येई पूर्ण ॥ १ ॥ मोक्ष इच्छा आहे तुज । तरी शरण यावें मज ॥ २ ॥ अहंता हें पाप थोर । तुवां जाणावें निर्धार ॥ ३ ॥ तुका ह्मणे माये करून । बोले गीतेंत हे खुण ॥ ४ ॥

॥ ५१२२ ॥ देहबुद्धि असे लोभ जयां चित्तीं । आपुलें जाणती परावें जे ॥ १ ॥ तयासि चालतां पाहिजे सिदोरी । दुःख पावे करी असत्य तो ॥ २ ॥ तुका ह्मणे धर्म रक्षाया कारणें । छाया इच्छी उन्हें तापला तो ॥३॥

॥ ५१२३ ॥ यम सांगे दूतां तुह्मां नाहीं तेथें सत्ता । जेथें होय कथा सदा घोष नामाचा ॥ १ ॥ नका जाऊं तया गांवां नामधारकाच्या शिवां । सुदर्शन यावा घरटी फिरे भोंवती ॥ २ ॥ चक्र गदा घेऊनि हरि उभा असे त्यांचे द्वारीं । लक्ष्मी कामारी रिद्धीसिद्धीसहित ॥ ३ ॥ ते बळिया शिरोमणी हरिभक्त ये मेदिनी । तुका ह्मणे कानीं यम सांगे दुतांचे ॥ ४ ॥

॥ ५१२४ ॥ कारितां तडाताडी । वत्सा माते सोई ओढी ॥ १ ॥ करिताचा आग्रह उरे । एक एकासाटीं झुरे ॥ २ ॥ भुके इच्छी अन्न । तेंहि त्यासाठीं निर्माण ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाती । एक एकाचिये चित्तीं ॥ ४ ॥

॥ ५१२५ ॥ पायांचें भूषण तीर्थाटण जाण । वांकिया पैंजण जाळावीं कां ॥ १ ॥ हस्ताचें भूषण अभय सेवा दान । सोन्यांचीं कंकणें जाळावीं कां ॥ २ ॥ कंठाचें भूषण सुस्वर कीर्तन । कंठाचीं भरणें जाळावीं कां ॥ ३ ॥ पोटाचें भूषण संतपोटीं जन । पापाचें संतान जाळावीं कां ॥ ४ ॥ नेत्रांचें भूषण सद्भावें देखणें । नाना दिव्यांजनें जाळावीं कां ॥५॥ जिव्हेचें भूषण ह्मणे रामकृष्ण । कल्माचें बोलणें जाळावें कां ॥ ६ ॥ तुका म्हणे नरदेह मुख्य जाण । पशुयोनी पूर्ण जाळावी कां. ॥ ७ ॥

॥ ५१२६ ॥ आड वाटे जातां लावी नीट सोय । धर्मनीती आहे ऐशी जगीं ॥ १ ॥ नाईकतां सुखें करावें ताडण । पाप नाहीं पुण्य ऐसें घडे ॥ २ ॥ जन्म व्याधी फार चुकतील दुःखें । खडी वाहा सुखें वास साचा ॥ ३ ॥ तुका म्हणे निवेदिलीयावांचून । अंतरींचा शीण निघे कैसा ॥ ४ ॥

॥ ५१२७ ॥ कोण दिवस येईल कैसा । नाहीं देहाचा भरंवसा ॥१॥ चौदा चौकड्या लंकापती । साची कोण झाली गती ॥ २ ॥ लंकेसारिखें भुवन । त्याचें त्यास पारखें जाण ॥ ३ ॥ तेहतीस कोटी बंदवडी । राज्य जातां नलगे घडी ॥ ४ ॥ ऐसे अहंतें नाडले । तुका म्हणे वांयां गेले ॥ ५ ॥

॥ ५१२८ ॥ परिसाचे अंगें सोनें झाला विळा । वाकणें या कळा हीन नव्हे ॥ १ ॥ अंतरीं पालट घडला कारण । मग समाधान तेंचि गोड ॥ २ ॥ पिकली हें संद पूर्वकर्मा नये । अव्हेरु तो काये घडे मग ॥ ३ ॥ तुका ह्मणे आणा पंगती सुरण । पृथक ते गुण केलें पाकें ॥४ ॥

॥ ५१२९ ॥ पंडित तोचि एक भला । नित्य भजे जो विठ्ठला ॥ १ ॥ अवघें सम ब्रह्म पाहे । सर्वां भूतीं विठ्ठल आहे ॥ २ ॥ रिता नाहीं कोणी ठाव । सर्वां भूतीं वासुदेव ॥३॥ तुका ह्मणे तोचि दास । त्या देखील्या जातीं दोष ॥ ४ ॥

॥ ५१३० ॥ आत्म अनुभवें चोखाळिल्या वाटा । साचे माथां जटा असो नसो ॥१॥ वाचेचा रसाळ अंतरीं निर्मळ । साचे गळां माळ असो नसो ॥ २ ॥ परस्त्रीचे ठायीं जो कां नपूंसक । साचे आंगा राख असो नसो ॥ ३ ॥ परद्रव्याचा त्याग परनिंदेसी मुका । तोचि सदां देखा तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ५१३१ ॥ सतीचा वोवसा जेणें पदरीं घ्यावा । संकल्प सोडावा जिवीत्वाचा ॥ १ ॥ जयानें पैं घ्यावें वेडियाचें सोंग । तेणें सर्व अंग बांधूनि धावें ॥ २ ॥ ब्रीद बांधोनियां ह्मणवी जो गाजी । तेणें मरणामाजी फिरूं नये ॥ ३ ॥ तुका ह्मणे ज्यासी पाहिजे संतपण । निंदो परी जन ढळों नये ॥ ४ ॥

॥ ५१३२ ॥ काय बोलोनियां तोंडें । मनामाजी कान कोंडें ॥ १ ॥ पर स्त्रीसीं ह्मणतां माता । चित्त लाजवीतें चित्ता ॥ २ ॥ धर्माधर्मीक गोष्टी

सांगे । उष्टें हातीं तुळवी कांगे ॥ ३ ॥ जुनें कर्म घडलें अंगीं । तें तें आठवी प्रसंगीं ॥ ४ ॥ बोले तैसा चाले । तुका ह्मणे तो अमोल ॥ ५ ॥

॥ ५१३३ ॥ नपुंसका हातीं दिधली पद्मीण जाती । शिंदळीस पती काय होय ॥ १ ॥ सुकरा कस्तुरी गाढवा चंदन । मर्कटा सिंहासन काय होय ॥ २ ॥ आंधळ्या दर्पण नकट्या भूषण । दारिद्री शहाणा काय कीजे ॥ ३ ॥ नपुंसका सिंहासन श्वानासी पालखी । देखोनियां भुंकी सर्वकाळ ॥ ४ ॥ तुका ह्मणे ऐसें पूर्वपुण्य कीजे । तरिच पाविजे ब्रह्मज्ञान ॥ ५ ॥

॥ ५१३४ ॥ अंगें तेसें व्हावें । मग देवारां बैसावें ॥ १ ॥ जैसें पाहे गंगाजळ । तैसें हृदय निर्मळ ॥ २ ॥ परक्याची कांता । जैसी मानी आपुली माता ॥ ३ ॥ तुका ह्मणे पायवणी । त्याचें पाजा मज कोणी ॥ ४ ॥

॥ ५१३५ ॥ साराचें हें सार वेदाचें जिव्हार । ध्याता रघुविर ऐक्य भावें ॥ १ ॥ द्वैताची झाडणी गुरुचे वचनीं । करूनीयां मनी गुह्य ध्यावें ॥ २ ॥ हरीचें हें नाम संतसमागम । होऊनी निष्काम देहातीत ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें नलगे आयास । पाहिजे विश्वास गुरुपायीं ॥ ४ ॥

॥ ५१३६ ॥ कळलें ह्मणती आह्मा ब्रह्मज्ञान । धुरेचें अज्ञान जाणावें तें ॥ १ ॥ व्यासशिवादिकां नव्हेची अंत । ज्ञान तें स्वतंत्र हरीरूप ॥ २ ॥ वृत्तिरूप ज्ञाना भुलले सकळ । राहिलें वेगळें अनादी जें ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरी हंसरूप झाला । बोधिलें पुत्राला तेंची खरें ॥ ४ ॥

॥ ५१३७ ॥ जे ठायीं गेला विवेक बुडून । विठ्ठल चरण तेची खरे ॥१॥ सकळ विपत्ती लाजोनियां गेल्या । श्रुति परतल्या नेति नेति ॥२॥ वेद महाराज पायीं मौनावला । सिद्धांती तो झाला समरस ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरीचरणाचा अंत । नकळे निश्चित ब्रह्मादिकां ॥ ४ ॥

॥ ५१३८ ॥ सर्वांचीं अंतरें जाणतोसी हरी । तयापुढें चोरी केवी घडे ॥ १ ॥मन बुद्धिजाती धुंडाया पदार्थ । विठ्ठल समर्थ उभा तेथें ॥ २ ॥ परद्वार केलें एकांतीं जाऊनीं । मानियेलें मनीं तिचें नाहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे साक्षी अनंत ब्रह्मांडीं । तस्कराचे पिंडीं कैसा नाहीं ॥ ४ ॥

॥ ५१३९ ॥ अनुभवा येतां विठ्ठल सांवळा । हरती सकळा आधिव्याधी ॥१॥ विरोनीयां जाती देहादिक भाव । अंतरीं माधव कृपा करी ॥ २ ॥ समदृष्टी ज्ञान प्रकाशिता हरी । परेहुनी पर सुख दावी ॥ ३ ॥ तुका ह्मणे गुरुकृपेचें हें फळ । येतो घननीळ प्रसयासी ॥ ४ ॥

॥ ५१४० ॥ पंच भूतें जाती लया । अंतीं आपुलाले ठाया ॥ १ ॥ आस्ति मांस पृथ्वी नेत । आप उदकीं मिळत ॥ २ ॥ तेज अग्नीरूप झालें । प्राण वायुसीं मिळाले ॥ ३ ॥ शब्द आकाशीं निमाला । त्रिगुणाचा क्षय झाला ॥ ४ ॥ तुका ह्मणे मृगजळ । भास लटीका सकळ ॥ ५ ॥

॥ ५१४१ जाणावी ती कृपा हरीची जाहली । चिंतनीं लाविली मनबुद्धी ॥१॥ अनुभव होतां वासना विराली । वृत्ती मुरडली उफराटी ॥२॥ नामरूप संतसेवन आवडे । कीर्तन पवाडे हरिचे गुण ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरीकृपेचीं लक्षणें । दिलीं नारायणें प्रेमळासी ॥ ४ ॥

॥ ५१४२ ॥ बळें देह मी ह्मणतां । कोटी ब्रह्महत्या माथां ॥ १ ॥ येऊनीयां आदळती । घोर नर्क भोगविती ॥ २ ॥ अहंकार बळावला । त्रिगुणानीं जोर केला ॥ ३ ॥ तुका ह्मणे बुडविलें । निजरूप गमाविलें ॥ ४ ॥

॥ ५१४३ ॥ पूर्ण ब्रह्म जे आहेती । सोडोनियां देह होती ॥ १ ॥ सत्ता ज्याची तिहीं लोकीं । करी देहाची पाइकी ॥ २ ॥ माया मृगजळ भास । हाचि धरिला विश्वास ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाश झाला । आपणासीं विसरला ॥ ४ ॥

॥ ५१४४ ॥ मातापिता याचें ऋण । फिटे गयावर्जनानें ॥ १ ॥ पोटीं पुत्र झालियानें । मुक्त बायकोपासून ॥ २ ॥ पुत्रापासून सुटला । त्याचा विवाह जाहला ॥ ३ ॥ तुका ह्मणे आत्मऋण । न फिटे चि गुरुविण ॥४॥

॥ ५१४५ ॥ पाय पहावे ते कोठें । अनुभवाचीये पेठे ॥ १ ॥ पाय पहावे ते मनीं । गुरु अमृत वचनीं ॥ २ ॥ पाय पहावे ते शास्त्रीं । तंतु आहे जैसा वस्त्रीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे जें जें दिसे । हरीरूपाचे प्रकाशें ॥ ४ ॥

॥ ५१४६ ॥ सर्व ह्मणणें हो पळ । सर्वरूपी हा गोपाळ ॥१॥ नाहीं दुजीयाची वार्ता । पूर्ण प्रकाश जो कर्ता ॥ २ ॥ तो हा माझा पांडुरंग । अवतार जो निःसंग ॥ ३ ॥ तुका ह्मणे अद्वैत । आहे राम अखंडित ॥४॥

॥ ५१४७ ॥ धन्य पुत्र माय पोटीं । निपजले रत्न कोटी ॥ १ ॥ हरीरूप अंगें झाला । ज्ञान स्वरूप शोभला ॥ २ ॥ कोटी ब्रह्मांडांचा धनी । प्रकाशक स्वयें मानी ॥ ३ ॥ तिळभरी अहंकार । नाहीं नये वृत्तीवर ॥ ४ ॥ तुका ह्मणे पूर्णपणें । जनीवनीं तो आपण ॥ ५ ॥

॥ ५१४८ ॥ गुरु मागतसे धन । शिष्य बोले दटाऊन ॥ १ ॥ कांहो मंत्र तुह्मी दिला । बलात्कार मज केला ॥२॥ पुरे तुझें गुरुपण । मंत्र घ्यावा परतोन ॥ ३ ॥ तुका ह्मणे दोघेजण । गेले अज्ञानें बुडोन ॥ ४ ॥

॥ ५१४९ ॥ स्वयें नाहीं जो तरला । काय तारी दुसऱ्याला ॥ १ ॥ मायापुरी पार होणें । तोचि कासे लावूं जाणे ॥ २ ॥ नाहीं भलसाचें काम । कृपावंत जरी राम ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरिवीण । पूर्ण कृपा करी कोण ॥४॥

॥ ५१५० ॥ स्वयें झाला ब्रह्म अंगें जो आपण । त्यासी च हे जन अवघे देव ॥ येरांनीं सांगावी रेसठ काहाणी । देह दीनरजनीं कर्मावया ॥ २ ॥ घालें नेणें आणिकांची तहान भूक । नकळलें सुख वेगळेंची ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें पाहिजे जातीचें । येर गबाळाचें काम नाहीं ॥ ४ ॥

॥ ५१५१ ॥ जन देव तरी पायांचि पडावें । त्याचिया स्वभावें चाड नाहीं ॥१॥ अग्नीचें सौजन्य शीतनिवारण ।पालवीं बांधोन नेतां नये ॥२॥ तुका ह्मणे विंचु सर्प नारायण । वंदावे दुरोन शिवों नये ॥ ३ ॥

॥ ५१५२ ॥ भूत भविष्य कळों यावें वर्तमान । हें तों भाग्यहीन त्यांची जोडी ॥ १ ॥ आह्मी विष्णुदासीं देव घ्यावा चित्तें । होणार तें होतें प्रारब्धें ॥ २ ॥ जगरूढीसाठीं घातलें दुकान । जातो नारायण अंतरोनी ॥ ३ ॥ तुका ह्मणे हा हो प्रपंच गाढा । थोरली ते पीडा रिद्धिसिद्धी ॥ ४ ॥

॥ ५१५३ ॥ लोहो परिसासीं रुसलें । सोनेंपणासी मुकलें ॥ १ ॥ येथें कोणाचें काय गेलें । ज्याचें तेणें अनहित केलें ॥ २ ॥ गंगा आली आळशावरी । आळशी देखोनि पळे दूरी ॥ ३ ॥ गांवा खालील ओहळ । रागें गंगेसी न मिळे ॥ ४ ॥ तुका केशवाचा दास । गुरुसी न भजे शिष्य ॥ ५ ॥

॥ ५१५४ ॥ तीर्थें केलीं व्रतें केलीं । चित्तीं वासना राहिली ॥ १ ॥ पृथ्वीतले देव केले । चित्त स्थिर नाहीं झालें ॥२॥ नग्न मौनी जटाधारी । राख लाविली शरीरीं ॥ ३ ॥ करी पंचाग्नि साधन । ठेवी मस्तकीं तो प्राण ॥ ४ ॥ नर होऊनी पशू झाले । तुका ह्मणे वांयां गेले ॥ ५ ॥

॥ ५१५५ ॥ मुक्त तो आशंका नाहीं जया अंगीं । बद्ध मोहोसंगीं लज्जा चिंता ॥ १ ॥ सुख पावे शांती धरूनि एकांत । दुःखी तो लोकांत दंभ करी ॥ २ ॥ तुका ह्मणे लागे थोडाच विचार । परी हे प्रकार नागविती ॥ ३ ॥

॥ ५१५६ ॥ नरदेहा यावें देवदास व्हावें । तेणें चुकवावें जन्ममरण ॥ १ ॥ नाहीं तरी वांया शिणविली माय । नरकासी जाय दीर्घकाळ ॥ २ ॥ देवाचेंचि ध्यान देवाचें पूजन । ऐसें हें साधन साधकाचें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मुखीं ह्मणा देवराय । तुक्या सुख होय नाहीं पार ॥ ४ ॥

॥ ५१५७ ॥ काय शूकरासी घालुनी मिष्टान्न । खरासी लेपन चंदनाचें ॥ १ ॥ काय शेजे बाजे मर्कटा विलास । अलंकार नास करुनी टाकी ॥ २ ॥ तुका ह्मणे काय पाजुनी नवनीत । सर्पा विष थित अमृतचि ॥ ४ ॥

॥ ५१५८ ॥ धणी करी शेत चारा चरे पक्षी । टोला लागे वृक्षीं हकनाक ॥ १ ॥ हात करी चोरी टोले पाठीवरी । दोष हा पदरीं संगतीचा ॥ २ ॥ तुका ह्मणे ऐसे दुष्टाचे संगती । गेले अधोगती भले भले ॥ ३ ॥

॥ ५१५९ ॥ एक आठवचि पुरे । सुख अवघे मोहरे ॥ १ ॥ कळों आलें माझ्या जिवें । मज माझियाचि भावें ॥ २ ॥ एक भाव चित्तीं । तरी कांहीं न लगे युक्ती ॥ ३ ॥ तुका ह्मणे मन । पुजा इच्छी नारायण ॥ ४ ॥

॥ ५१६० ॥ ढवळलें जगदार । तो अंधार हरपला ॥ १ ॥ लपूं जातां थारा नाहीं । प्रगट पाही पसारा ॥ २ ॥ तुका ह्मणे याजसाठीं । आतां तुटी जिवाची ॥ ३ ॥

॥ ५१६१ ॥ अंतरीं निर्मत्सर । सबाह्य कोमळ जिव्हार ॥ १ ॥ नाहीं द्वेष जया चित्तीं । समता ती सर्वां भूतीं ॥ २ ॥ निर्मळ अंतर । शुद्ध सत्वाचा आगर ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसे । ते ते विठोबासरिसे ॥ ४ ॥

॥ ५१६२ ॥ सत्वधीरापाशीं । राहे जतन जिवेंसी ॥ १ ॥ तरी पुण्य पडे गांठीं । उभा जवळी जगजेठी ॥ २ ॥ आवडे हे प्रीती । पाहे छळुनियां चित्तीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे दृढ मन । अंगीं देव तो आपण ॥ ४ ॥

॥ ५१६३ ॥ जिवा जीव साक्ष असे । मध्यें वसे अहंता ॥ १ ॥ नाडियेले ऐसे लोक । किती एक सांगावें ॥ २ ॥ वासनेची नघे तुटी । जिवा आणि करी नेटीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे सांडी संग । करा लाग स्मरणीं ॥ ४ ॥

॥ ५१६४ ॥ पिंड पोसावे हें अधमाचें ज्ञान । विलास मिष्टान्न करूनियां ॥ १ ॥ शरीर रक्षावें हा धर्म बोलती । काय असे हातीं त-

याचिया ॥ २ ॥ क्षणभंगुर हें जाय न कळतां । ग्रास गिळी सत्ता नाहीं हातीं ॥ ३ ॥ कर्वतिलीं देहें कापियेलें मांस । गेले वनवासा शुकादिक ॥ ४ ॥ तुका म्हणे राज्य करितां जनक । अग्नीमाजी एक पाय जळे ॥ ५ ॥

॥ ५१६५ ॥ बीजीं फळाचा भरंवसा । जतन सिंचनासारिसा ॥ चाविलिया आसा । काकुलती ते नाड ॥ १ ॥ हा तो गडसंदिचा ठाव । पिके पिकविला भाव ॥ संकोचोनि जीव । दशा केली जतन ॥ २ ॥ माती घाली धनावरी । रांडा रोटा वरीवरी ॥ सुखाचे शेजारीं । दुःख श्रमें भोगितसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे दिशा भुली । झाल्या उफराटी चाली ॥ निवाडाची बोली । अनुभवें साक्षीसी ॥ ४ ॥

॥ ५१६६ ॥ नष्ट सागुनी संगती । घात होती बहुतां ॥ १ ॥ काय मागावें कोणासी । मुख्य ऐसी स्व निष्ठा ॥ २ ॥ संग लटिक्याचा दुरी । लाग करी चित्तानें ॥ ३ ॥ तुका ह्मणे गुणी ऐसा । देव तैसा वंदितो ॥ ४ ॥

॥ ५१६७ ॥ स्वरूपाचे ठायीं चित्त तें बैसेना । जाणावें वासना गेली नाहीं ॥ १ ॥ काया वाचा चित्त जडे भगवंतीं । तेव्हां होय शांति वासनेची ॥ २ ॥ तुका ह्मणे रामनामाचा हो घोष । तेणें वासनेस क्षय होय ॥ ३ ॥

॥ ५१६८ ॥ जगीं धन्य ते माउली । मानी भ्रताराची बोली ॥ १ ॥ तिचें होतां दरुशन । मिळे पोटभरी अन्न ॥ २ ॥ नेणें व्रत उपोषण । एका भ्रतारावांचून ॥ ३ ॥ पाळी अतीत अभ्यागता । जैसी बाळालागीं माता ॥ ४ ॥ तिसी उपमा काय द्यावी । शिव शक्ति ते मानावी ॥ ५ ॥ परपुरुष मानी पिता । तुका ह्मणे धन्य माता ॥ ६ ॥

॥ ५१६९ ॥ इंद्रियांसी लाड देणेंचि ओंगळ । घातक केवळ परमार्थासी ॥ १ ॥ व्याघ्रासी संसर्ग सर्पासी खेळणें । इंद्रियां पाळणें तैशापरी ॥२॥ म्हणोनी भल्यानें दमोनी चालावें । लोलुप्य न व्हावें इंद्रियांसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे धोका चौऱ्याशीचा घ्यावा । विषयाच्या भावा आतळीतां ॥ ४ ॥

॥ ५१७० ॥ असोन सांगावें हित ब्रह्मज्ञान । तरी या पठण उपकार ॥ १ ॥ सर्वदा जो करी सदा सावधान । परम पावन तोचि एक ॥ २ ॥ पर उपकार मानी परजनां । समान करुणा सर्वांभूतीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसें जो का ब्रह्मज्ञान । वदे तो सज्जन समदृष्टी ॥ ४ ॥

॥ ५१७१ ॥ थोराचिया मना नीचाचें भाषण । नये अनुमान पडतसे ॥ १ ॥ परिसें धातूतें धिःकारिल्यावरी । कैंचा तयावरी गुण चढे ॥ २ ॥ कल्पतरू तळीं याचक अतृप्त । कोणतें महत्व आलें अंगा ॥ ३ ॥ घरीं चिंतामणी चिंता जरी उरे । काय त्याचें सरे थोरपण ॥ ४ ॥ तुका ह्मणे देह विठोबाचे पायीं । ठेविलिया कायी लाज नये ॥ ५ ॥

॥ ५१७२ ॥ असत्य तें पाप सुकृताचा लोप । दुष्टा वज्रलेप दोष होती ॥ १ ॥ अनाचारी गर्भी भोगी नरकास । स्वर्गी पितरांस ठाव नाहीं ॥ २ ॥ असत्य असुर असे दुराचार । असत्यासी थार नाहीं कोठें ॥ ३ ॥ सत्यपुण्यक्षय श्वान खर होय । असत्यानें जाय यशकीर्ति ॥४॥ असत्यानें भोग जोडे क्षयरोग । असत्याचें अंग विटाळाचें ॥ ५ ॥ असत्य तो क्रोधी असत्य दुर्बुद्धि । असत्यासी व्याधी नाना होत ॥ ६ ॥ असत्य अपेशी असत्य तें दोषी । सत्य असत्यासी नाहीं कदा ॥ ७ ॥ तुका ह्मणे मुक्ति सत्यापाशीं घेणें । असत्यानें जाणें यमलोका ॥ ८ ॥

॥ ५१७३ ॥ शब्दीं गौरवीत वाणी । भाव आंत वरी दोनी ॥ १ ॥ शोभे तरीच हे वेडी ! नग्न होय धडफुडी ॥ २ ॥ नाहीं जीवित्वाची आस्था । लज्जा भय शंका-चिंता ॥ ३ ॥ काय न पाहों आणिकां । मागें दुजें ह्मणे तुका ॥ ४ ॥

॥ ५१७४ ॥ कथेचिया मिषें करितो सोहळे । पुरवी डोहळे वासनेचे ॥ १ ॥ कायीसी सांगणें सांगोनी नेटका । आपण फुटका परळ जैसा ॥२॥ गातों तेंचि नाहीं कांहीं तया ठावें । तोंड वासी देव म्हणतसे ॥३॥ तुका म्हणे मद्य पायस मिष्टान्न । तैसा तो दुर्जन शिवों नये ॥ ४ ॥

॥ ५१७५ ॥ आह्मा कवतुक जगा द्या नीत । करावें फजित चुकलिया ॥ १ ॥ कासयाचा वाद एकाच्या निरोपें । काय व्हावें कोपें जगाचिया ॥ २ ॥ आविद्येचा येथें कोठें परिश्रम । रामकृष्णनाम ऐसे बाण ॥ ३ ॥ तुका ह्मणे येथें खऱ्याचा विकरा । न सरती येरा खोट्यापरी ॥ ४ ॥

॥ ५१७६ ॥ काळ उचितानुचित । वेळ रक्षीसी अनंत ॥ १ ॥ युक्ति आपुलिया बळें । साह्य प्रसंगीं त्या फळे ॥ २ ॥ नेम साधनीं पारिखें । सुख नसावें हें दुःख ॥ ३ ॥ तुका म्हणे काय यांत । मानूं नये दुजी मात ॥ ४ ॥

॥ ५१७७ ॥ हीनवरा भार्या सदा दुःख भोगी । वयसा अभोगीं व्यर्थ जाय ॥ १ ॥ सदा हडहडी न कोणी ह्मणे बरें । सासुरवास पार तें ही करी ॥ २ ॥ सासुरा म्हणती पोशिलासे दांडा । पाठी लागे भांडा सर्व काळीं ॥ ३ ॥ नणंद कामासी सदा द्वेष करी । सुधिया उत्तरीं नये कदा ॥ ४ ॥ भावा म्हणे कैसा पोसिला हा रेडा । नेसाया धोंगडा धड नेदी ॥ ५ ॥ द्वेषिया तो दिर सदा करी चेष्टा । हिचिया अदृष्टा हद्द नाहीं ॥ ६ ॥ वर्जी अन्न सासु लवण ज्या नाहीं । रात्रंदिन पाहीं द्वेष मोठा ॥ ७ ॥ जावा काम घेती निज नाहीं रात्रीं । चकलिया देती शिव्या मार ॥ ८ ॥ घरींचें कोणीही न पाहेचि धड । अवघ्यांत द्वाड मानीतसे ॥ ९ ॥ भ्रतार खेळतां दिस नेणे रात्र । पोटीं कैचा पुत्र अभागीण ॥ १० ॥ माहेरीं तों कोणी न पुसेचि कधीं । चिंतेचिया मधीं बुडलीसे ॥ ११ ॥ तुका ह्मणे क्षण नाहीं सुखलेश । तया पंढरीश कैसा पावे ॥ १२ ॥

॥ ५१७८ ॥ कुळधर्मे पुण्य कुळधर्मे दान । कुळआचरण योग्य होय ॥ १ ॥ कुळधर्माचार कुळधर्म थोर । कुळधर्म सार साध्य होय ॥ २ ॥ कुळधर्म भुक्ती कुळधर्म मुक्ति । कुळधर्म पूर्ति पितृदेव ॥ ३ ॥ कुळधर्म पूजा घडतसे देवा । नव्हे दुज्या भावा कुळधर्म ॥ ४ ॥ तुका म्हणे देव भेटे कुळधर्मे । नये जरी कर्मे मध्यें कांहीं । ५ ॥

॥ ५१७९ ॥ स्वधर्म विरक्ति स्वधर्म ते भक्ति । स्वधर्मे विश्रांती परलोकीं ॥ १ ॥ ऐसें वर्म कोणी जाणे भाग्यवंत । तेथेंचि अच्युत वास करी ॥ २ ॥ स्वधर्म तो श्रेष्ठ स्वधर्म वरीष्ठ । स्वधर्म उद्भट साधनासी ॥ ३ ॥ स्वधर्मी महंती स्वधर्मी सद्भक्ती । स्वधर्मे तीं होती पुण्य श्लोक ॥ ४ ॥ तुका ह्मणे राहे स्वधर्मासी तर । तेथें तो श्रीधर तिष्ठतसे ॥ ५ ॥

॥ ५१८० ॥ स्वधर्मेचि ज्ञान स्वधर्मेचि मान । स्वधर्म तें मौन साधकासी ॥ १ ॥ स्वधर्म आचार विहित सकळां । दुर्लभ गोपाळा योग्य होय ॥ २ ॥ स्वधर्म तो मूळ स्वधर्मी च कुळ । स्वधर्म केवळ साधे तया ॥ ३ ॥ स्वधर्म नाशीतो भवभय रोग । स्वधर्म तो योग अष्टांगादि ॥ ४ ॥ स्वधर्म तो भाव स्वधर्म तो देव । तुका ह्मणे शिव माथां वाहे ॥ ५ ॥

॥ ५१८१ ॥ सत्य तोंचि धर्म सत्य तोंचि नेम । सत्यामुखीं नाम सर्वकाळ ॥ १ ॥ सत्या घडे भक्ति सत्या जोडे शांती । सत्यापाशीं मुक्ति तिष्ठत-

से ॥२॥ सत्य तेंचि तप सत्य वडे जप । सत्य तेंचि रूप सद्भक्तीचें ॥ ३ ॥ सत्य तोचि धीर सत्य कुळाचार । सत्य तोचि सार ज्ञानमार्गी ॥ ४ ॥ सत्याचार शीळ सत्य तें प्रबळ । योग तो सफळ सत्य होय ॥ ५ ॥ सत्यापाशीं देव उभा स्वयंमेव । तुका ह्मणे देव भक्तां साह्य ॥ ६ ॥

॥ ५१८२ ॥ शांती जया अंगीं बाणली तयासी । देहभान त्यासी नाहीं जाण ॥ १ ॥ शत्रु मित्र बंधु ब्रह्मांड सोयरे । नाहीं मानीत रे भेद बुद्धी ॥ २ ॥ काम क्रोध लोभ नये दंभ चित्ता । न धरी सर्वथा आशापाश ॥ ३ ॥ जयासी सकळ दया सर्वांभूतीं । तुका ह्मणे चित्तीं तोचि देव ॥ ४ ॥

॥ ५१८३ ॥ एकांतींचा वास आवडला मना । बोडिली वासना समुळेंसी ॥ १ ॥ होउनी निःशंक सेवावें अरण्य । जोडी करा पुण्य वैराग्याची ॥ २ ॥ पोटा लागे तरी समर्यां वनांत । फळ पुष्प पत्र कांहींतरी ॥ ३ ॥ धीर करूं संगीं नाम गावें सदा । हृदयीं गोविंदा सांठवूनी ॥ ४ ॥ नसावें भाषण दुजा अक्षरेसी । रामकृष्ण ऐसीं वांचोनीयां ॥ ५ ॥ तुका ह्मणे ऐसा धरावा निर्धार । भवनदी पार तोचि एक ॥ ६ ॥

॥ ५१८४ ॥ ऐका सेट धरणींत । गोपीनाथ सावध ॥ १ ॥ खोटा चाकर चाकर ।करी कर समत्व ॥ २ ॥ कामकाजधंदा गोड । ते पवाडे ऐकतां ॥ ३ ॥ तुका ह्मणे तोचि धणी । नारायणीं साक्षात ॥ ४ ॥

॥ ५१८५ ॥ पोटासाठीं ज्ञानी । कीर्ति थोराची वाखाणी ॥ १ ॥ असो कोठील मी कोण । करूं विचार हा नेणें ॥ २ ॥ आहे उभा जवळीच । देवा मागणें तें साच ॥ ३ ॥ तुका ह्मणे स्तुती । करी नर धिग माती ॥ ४ ॥

॥ ५१८६ ॥ पोटा न मिळे खावया । जाय वायां न करी ॥ १ ॥ कर्म सांडुनियां धर्म । व्यर्थ श्रम करीत ॥ २ ॥ नाना सोंगें द्रव्यासाठीं । करी आटी आर्जव ॥ ३ ॥ तुका ह्मणे नेणे वर्म । जोडी कर्म पातक ॥ ४ ॥

॥ ५१८७ ॥ गृह धन मोह त्यागियला देह । झाला उर्ध्व बाहो शुद्ध बुद्ध ॥ १ ॥ देव राखे जैसें ठेविलिया ठायीं । निश्चळ हृदयीं राहे तेथें ॥ २ ॥ वन दारा राहे हिंडे इच्छा करी । आवडती परी त्याग केला ॥ ४ ॥ तुका ह्मणे कदां नाहीं धैर्या भंग । तेथें चि श्रीरंग वस्ती राहे ॥ ४ ॥

॥ ५१८८ ॥ निर्वाहाकारणें वृक्षाची संगती । न बैसोचि क्षीत थाडेश्वर ॥ १ ॥ सोसीतसे जाच शरीर क्लेशासी । धरूनी मानसीं नारायण ॥ २ ॥ पोटाची विपत्ती सांगों नेणें जना । अंतरीं भावना दुजी नाहीं॥३॥तुका ह्मणे काया कष्ट अनुष्ठान । तया नाहीं येणें जाणे कोठें॥४॥

॥ ५१८९ ॥ अवघ्या पदार्थीं सजियली भ्रांती । या नांवें विरक्ति अंगा आली ॥ १ ॥ स्वप्नांत ही नेणें जनांचें सौजन्य । सेविलें अरण्य एकांतीया ॥ २ ॥ असो नसो खाया वांचो मरो देहे । न पाहेचि सोये जीवित्वाची ॥ ३ ॥ जात नाहीं फिरो देत ही वृत्ती । तेथेंचि विरक्ति वस्ती राहे ॥ ४ ॥ तुका ह्मणे नाहीं पदार्थीं अपेक्षा । आपुलीच दिक्षा आपणांसी ॥ ५ ॥

॥ ५१९० ॥ दाविले प्रकार निवडिलें सार । आश्चर्य साचार जनालागीं ॥ १ ॥ आणियेलीं पानें बैसलासे हाटीं । गिऱ्हाइक दृष्टी आणिताती ॥ २ ॥ जयासी पाहीजे तितुकेंच दिलें । कृपाया विठ्ठलें केली तैसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे ज्याचे पोटीं असे वाव । त्यानीं तैसा देव जोडियेला ॥ ४ ॥

॥ ५१९१ ॥ जिवें जित कोष्टी खांचे घातलासे । विणी सावकाशें एक चित्तें ॥ १ ॥ जोडुनियां तंतू सांधी वऱ्यावोजा । आवडत्या काजा संसारीच्या ॥ २ । तुका ह्मणे तैसें देवापायीं चित्त । राहिलिया नित्य धन्य तोचि ॥ ३ ॥

॥ ५१९२ ॥ भक्तिचिया पेंठे आणियलें केणें । सांगतों हें घेणें लागे तैसें ॥ १ ॥ सुखाचे शेजारीं मांडिलें दुकान । टेविलें सोडून आवडीये ॥ २ ॥ सुखाचें सवंग फुकाचें साचार । भरलें अपार न सरेचि ॥ ३ ॥ थोर थोर मागें होते भाग्यवंत । त्यांहीं साधु संत पारखीले ॥ ४ ॥ तुका ह्मणे घडी घडीनें मालाची । पाहिजे त्या रूची घेती मोलें ॥ ५ ॥

॥ ५१९३ ॥ जयाचे स्मरणें वारिती दुरीतें । भवसिंधू रितें होय नामें ॥ १ ॥ जन्म जया कुळीं वंश वंशावळी । तारिले सकळी नाम घेतां ॥ २ ॥ अवचट नाम स्मरे वाचे राम । तया नाहीं धाम यमाचेंही ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याचीं कोटी कुळें जात । नित्य गात गीत वैकुंठासी ॥ ४ ॥

॥ ५१९४ ॥ असत्या विटाळ हा नव्हे मत्सर । सांगतों साचार आइकावें ॥ १ ॥ येऊं नका रागा शिकवणेसाठीं । उपेगाची गोष्टी पुढें आ-

हे ॥ २ ॥ लटिक्याच सांगें नेली सीता सती । कुळेंसह होती भस्म राज्य ॥ ३ ॥ असत्यानें छळी पंडुचिया पुत्रां । कुंभपाकीं यात्रा दुर्योधना ॥४॥ तुका म्हणे ऐसें सांगों किती मागें । बहुतां प्रसंगें दुःख दिलें ॥ ५ ॥

॥ ५१९५ ॥ भाग्य पुरुषाची देखिली संपदा । आपली आपदा जाइच ना ॥ १ ॥ कुणब्याचें शेत पाहे डोळेभरी । आपलें तें घरीं अन्न नाहीं ॥ २ ॥ देह कष्टवीना ज्ञानाचा अभाव । कैसी देवराव कृपा करी ॥ ३ ॥ ओळखीकारणें अर्जव करिती । तेव्हां साची रिती कळूं लागे ॥ ४ ॥ तुका ह्मणे आशा दुराशा सजावी । मुक्तीची पदवी पावतसे ॥ ५ ॥

॥ ५१९६ ॥ सर्व देव साधा । परी अवगुण बाधा ॥ १ ॥ नव्हे ह्मणवूनि सरी । राहे एका एक दुरी ॥ २ ॥ उंस कांदा एक आळा । परी गोडीचा निराळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे नव्हे सरी । विष अमृताचे परी ॥ ४ ॥

॥ ५१९७ ॥ शुद्ध गौरवापुरतें । फळ सत्यत्व संकल्पें ॥ १ ॥ योगा कठीण त्या क्षेम । होतो वोकल्यानें श्रम ॥ २ ॥ हात पावे शिवे पाशीं । क्लेश उरत ते क्लेशीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे बहु आणी । खोटे निघालीया रणीं ॥ ४ ॥

॥ ५१९८ ॥ सर्व दुर्बळ हे जन । नारायणें विन्मुख ॥ १ ॥ हात सांडुनियां जाती । पात्र होती दंडासी ॥ २ ॥ शिदोरी ते पाप पुण्य । सर्व शिण भिकेचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाहीं नाश । आह्मा म्हणविल्या दास ॥ ४ ॥

॥ ५१९९ ॥ सर्वां पुरे ऐसा वाण । आलें धन घरासी ॥ १ ॥ घ्या-रे फुका मोलेंविण । नारायण न भुला ॥ २ ॥ ऐका कळलियां मन । श्रोते कान सादर ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरी । यत्न प्रल्हादासी करी ॥ ४ ॥

॥ ५२०० ॥ काय नसे दैन्यवाणें । कांहीं तुमच्या कृपेनें ॥ १ ॥ हेचि तयाचि ओळखी । घाले संतोष त्या मुखीं ॥ २ ॥ वांयां जात नाहीं । प्रीतिवचन तें कांहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा । सत्य येतें अनुभवा ॥ ४ ॥

॥ ५२०१ ॥ केलें पुनीत सर्वांसी । संग आपुलीया देशीं ॥ १ ॥ कोण पाहे तयाकडे । वीर विठ्ठलाचे गाढे ॥ २ ॥ अशुभ त्यापुढें । होय शुभ ठाके पुढें ॥ ३ ॥ प्रेम सुखाचिया राशी । पाप नाहीं ओखदासी ॥ ४ ॥ तुका ह्मणे त्यांनीं । केली वैकुंठीं मेदिनी ॥ ५ ॥

॥ ५२०२ ॥ भक्ति आम्हां कांहीं सांगा । कृपाळू व्हा पांडुरंगा ॥ १ ॥ बैसे ठोकत बाहेर । भक्ता वाहाती निर्धार ॥ २ ॥ ज्ञानाचा आधार । काय पहावा साचार ॥ ३ ॥ तुका ह्मणे ध्यान । कृपा करी नारायण ॥ ४ ॥

॥ ५२०३ ॥ न सरे भांडार । भरे वेचिता अपार ॥ १ ॥ पोट मवी त्याचे भरें । पुढें पुढीलासी उरें ॥ २ ॥ कारणा पुरता । लाहो आपुलाल्या हिता ॥ ३ ॥ तुका म्हणे देवा । पुढें केला चाला हेवा ॥ ४ ॥

॥ ५२०४ ॥ हरी अंतरीं बाहेरी । हरी घरीं कोंडिलें ॥ १ ॥ हरी कामा घाली चिरा । वित्त वरा मुकवी ॥ २ ॥ हरी केली जिवेंसांटी । पाडी तुटी सकळां ॥ ३ ॥ तुका वेगळें तें नव्हे । हरी भवे भोंवता ॥ ४ ॥

॥ ५२०५ ॥ असे सकळां वेगळा । खेळे कळा चोरुनी ॥ २ ॥ खांब सूत्राचिये परी । देव दोरी हालवी ॥ २ ॥ राहे आपण निराळा । कैसी कळा नाचवी ॥३॥ जेव्हां आसुडितो दोरी । भुमीवरी पडेना ॥ ४ ॥ तुका ह्मणे तो जाणावा । सखा व्हावा आपुला ॥ ५ ॥

॥ ५२०६ ॥ शुद्ध चंदन सुमन । सदा गुणसंपन्न ॥ १ ॥ धन्य वेधलिया जाती । भाग्यें होती सन्मुख ॥ २ ॥ सदा परिसा सद्गुण । ते बाणोन राहिलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे कैंचि खंती । सुजाती ते ठाकणी ॥ ४ ॥

॥ ५२०७ ॥ हरीकीर्तनाचे अंतीं । नाम अखंड ह्मणती ॥ १ ॥ तेंचि सुकृताचें फळ । वाचा श्रीराम निरवळ ॥ २ ॥ बैसोनियां कीर्तनासी । होय सावध चित्तासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याचा जन्म । मुक्त झाला भवभ्रम ॥ ४ ॥

॥ ५२०८ ॥ चित्तापासुनी संकल्प । नव्हे तेव्हां जाय पाप ॥ १ ॥ तरी देव कृपा करी । दयाळुवा माझा हरी ॥ २ ॥ सांडी धुवोनियां मळ । कामक्रोधादि विटाळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे पाणी गंगा । देह दोष नुरे अंगा ॥ ४ ॥

॥ ५२०९ ॥ सांडुनियां भक्तिमार्ग । जातें जग आडराना ॥ १ ॥ मला पाहतां नवल । देखें डोळां आश्चर्य ॥ २ ॥ थोड्यासाठीं दंभ किजे । जाणें भोजे नर्कासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे बुद्धि । सांडी शुद्धि देहाची ॥ ४ ॥

॥ ५२१० ॥ गळां लाउनी चऱ्हाट । हिंडवितां ते मर्कट ॥ १ ॥ ते संसार सांकळी । मोहें बांधलासे जाळीं ॥ २ ॥ नेणें स्वहीत तें काय । नाम विसरोनी जाय ॥ ३ ॥ तुका ह्मणे कर्मभाव । न सुटे हा धर्मचि स्व ॥ ४ ॥

॥ ५२११ ॥ भाग्यवंत तोचि एक । नाम वदे ज्याचें मुख ॥ १ ॥ येर मनु धोंड्या ऐसे । लोळे गोखडीस तैसे ॥ २ ॥ शांती विरक्ति न जाणे । श्रेष्ठ श्रेष्ठाचें वचन ॥ ३ ॥ तुका ह्मणे एक देख । करी आळस तो मुर्ख ॥ ४ ॥

॥ ५२१२ ॥ छंद बरवा बरवा । बैसे वाचेसी माधवा ॥ १ ॥ बहु साधनाची आटी । बुडूं नको होसी कष्टी ॥ २ ॥ बुद्धि साहे तरी । बोलामाजि जोडे हरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे बळ । नाहीं तात्काळची फळ ॥ ४ ॥

॥ ५२१३ ॥ ओढी भविष्य ते माथां । भक्ति न करी सर्वथा ॥१॥ जो जो आला आंगा भोग । भोग सहसा तो रोग ॥२॥ भार असावें निमित्य ॥ माथां एकचि या सत्य ॥ ३ ॥ तुका म्हणे बहु काळें । करी कुढावा गोपाळ ॥ ४ ॥

॥ ५२१४ ॥ मार्गण सांडी लागला । एका घायें जीव गेला ॥ १ ॥ हरीनामासवें उडी । मारी देहभाव सांडी ॥ २ ॥ माती घाली तोंडीं । करी आळसाची धडी ॥ ३ ॥ तुका ह्मणे माप । चुके चवऱ्यांयशी खेप ॥ ४ ॥

॥ ५२१५ ॥ कांहीं न घेतां कोणाचें । यथाशक्ति करी साचें ॥ १ ॥ तया पुण्या नाहीं जोडा । परोपकार नाहीं थोडा ॥ २ ॥ करी कन्यादान । तीर्थ घेऊन वंदन ॥ ३ ॥ तुका ह्मणे हात । जोडोनियां प्रणिपात ॥ ४ ॥

॥ ५२१६ ॥ श्रेष्ठ ह्मणावें तयासी । जाणे वर्म कळा ऐशी ॥ १ ॥ नेणे दुजा भाव मनीं । चाले शास्त्र विवंचुनी ॥ २ ॥ तोचि प्राणी ह्मणों भला । सदा चिंतितो विठ्ठला ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसा । तोचि देवापें सरिसा ॥ ४ ॥

॥ ५२१७ ॥ शत्रु अवघड । शरण ह्मणवितें तोंड ॥ १ ॥ असे अनुज्ञाचि आण । तुह्मा विचारावें पुण्य ॥ २ ॥ काकुलती शिर । सत्या निमित्य विचार ॥ ३ ॥ तरी अंतर तें दुजें । हें न पाहिलें पाहिजे ॥ ४ ॥ तुका ह्मणे जोडे यश । पुढें वाढे कीर्तिघोष ॥ ५ ॥

॥ ५२१८ ॥ आशा नांव वेर । जोडे परदुःखा नाश ॥ १ ॥ सांटी सर्वस्वाची जोडी । वरी उपकार प्रौढी ॥ २ ॥ नेणे मानामान । गेलियाची आठवण ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसा । यश कीर्तनें सरिसा ॥ ४ ॥

॥ ५२१९ ॥ अंगीं अयाचित वृत्ति । भार देवावरी प्रीति ॥ १ ॥ नेणे नाशवंत । अर्थ जोडी न शाश्वत ॥ २ ॥ शुद्ध परमार्थी । वाहे उपकार चिंता ॥ ३ ॥ तुका ह्मणे पांडुरंग । राहे धरून त्या अंग ॥ ४ ॥

॥ ५२२० ॥ चाकरीवेगळें । खातां तोंडें तें वेगळें ॥ १ ॥ काढी हिशोब ते धणी । लाभ दंड पूजास्थानीं ॥ २॥ रहावें तें सेवे रुजु। तेव्हां पृथ्वी होय उजु ॥ ३ ॥ तुका ह्मणे कोणी । राखे नाहींसा मेदिनी ॥ ४ ॥

॥ ५२२१ ॥ करितां ही कन्यादान । कुळ गोत्र तें शोधून ॥ १ ॥ हाचि असे वृद्धाचार । कळों यावे श्रेष्ठाधार ॥ २ ॥ पंगतीस याती । मुळीं शोधुनी पाहाती ॥ ३ ॥ तया नाहीं चिंता मग । काय कारणाचें अंग ॥४॥ तुका ह्मणे मूळ । शोध पाहिजे तें कुळ ॥ ५ ॥

॥ ५२२२ ॥ वायां संवसार । वाड झाले लोकाचार ॥१ ॥ खरें लटकेंतें केलें । मायामोहें भुलविलें ॥ २ ॥ मी हें काय जाणे ऐसें । जेणें पुढें पडे नाश ॥ ३ ॥ नव्हे श्रृंगार उत्तरीं । तुम्हा गौरवी कुसरी ॥ ४ ॥ केलेंसे विदेशी । भापाहीन अनारिसी ॥ ५ ॥ समस्तासी तुका । मारी न भुलतां हाका ॥ ६ ॥

॥ ५२२३ ॥ मुख्य धर्म ब्राम्हणाचा । सदा शुची देह साचा ॥ १ ॥ मुखीं उच्चारावें नाम । नये वाचा अनाश्रम ॥ २ ॥ अग्निहोत्र्यादि याज्ञिक । रक्ष षट्कर्मी लोक ॥ ३ ॥ वानप्रस्थ तरी । दंड साक्षी निद्रा करी ॥ ४ ॥ स्त्रियां संयोगीं वियोग । तेव्हां कर्म घडे सांग ॥ ५ ॥ तुका म्हणे नेम । पडे चुकलिया भ्रम ॥ ६ ॥

॥ ५२२४ ॥ शेटे आणि तो चौधरी । पांडपण वाहे शिरीं ॥ १ ॥ पाप नलगे धुंडावें । लागे तेणें तेथें जावें ॥ २ ॥ गाई म्हशी रेडे घोडे । जे जे विकताती द्वाड ॥ ३ ॥ पारपत्य देवा गारीं । करी खिस्तीचा व्यापारी ॥ ४ ॥ तुका म्हणे जारे तेथें । पुण्य रीघ नाहीं जेथें ॥ ५ ॥

॥ ५२२५ ॥ वस्ती दिल्या चोरा । कैचा विश्रांतीसी थारा ॥ १ ॥ पडे वासनेची धडी । वगी बंधखान जोडी ॥ २ ॥ वैरी केला गडी । वेळ समयासी नाडी ॥ ३ ॥ विचाराचा नाड । आहे आंगळ ते खोड ॥ ४ ॥ तुका ह्मणे बेडी । विना खोटी आशा पाडी ॥ ५ ॥

॥ ५२२६ ॥ झरा आनंदाचा । झाली सुरळीत वाचा ॥ १ ॥ झटे माझें माझें ओझें । झुगारिलें तें सहजें ॥ २ ॥ झोडिला संसार । झाडा दिला हरीहर ॥ ३ ॥ झांकूं नका डोळे । झोला देती कळीकाळ ॥ ४ ॥ तुका म्हणे तुझा । तुम्ही आपुल्या तें बुझा ॥ ५ ॥

॥ ५२२७ ॥ आलें घरा दिसे नेत्रीं । नको श्रोत्रीं धुंडावें ॥ १ ॥ गिरी कंदरी अघोर । नको फार शोधावें ॥ २ ॥ नाहीं सायासाचें काम । नेघे श्रम साधन ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाती वाटे । मोडू काटे नेदीतो ॥ ४ ॥

॥ ५२२८ ॥ जन्मा आले वायां जाती । ते विपत्ती भोगुनी ॥ १ ॥ काय ओढवले नष्ट । केलें भ्रष्ट प्रारब्धें ॥ २ ॥ खर पालाणिले भारें । मृत्यु खरें न सुटे ॥ ३ ॥ तुका ह्मणे पाठीं पेणी । सुटे गोणी सांडीतां ॥ ४ ॥

॥ ५२२९ ॥ चिंता करणें श्रीमंता । नाहीं आतां कशाची ॥ १ ॥ देव तया प्रतिपाळी । लडिवाळी म्हणोनि ॥ २ ॥ दृढ अनुभव चित्ता । राहे होतां तें करा ॥ ३ ॥ तुका ह्मणे तोचि एक । हा तारक विठ्ठल ॥ ४ ॥

॥ ५२३० ॥ अंगीच्या सामर्थ्यें । चाले बोले पुरुषार्थें ॥ १ ॥ पाठी देवाचें हें बळ । मग लाभ हातीं फळ ॥ २ ॥ देव जाहलासे साह्य । तेणें केलें सर्व होय ॥ ३ ॥ तुका ह्मणे स्वामीसत्ता । तेथें नाहीं भयचिंता ॥४॥

॥ ५२३१ ॥ परपीडा सुख मानी सावकाश । बाहिरल्या वेष भोगण्याचे ॥ १ ॥ देव गुरुद्रोही ब्राह्मण असतां । प्रत्यक्ष पहा तो अति शूद्र ॥ २॥ तुका ह्मणे जाण सहसा तो मुर्ख । नीट धरी देख यमपंथ ॥ ३ ॥

॥ ५२३२ ॥ तरी निर्भर ते दास । चिंता आस वेगळे ॥ १ ॥ एकीं अवघाचि ठाव । सर्वभाव विठ्ठलीं ॥ २ ॥ तेव्हां निरविलें त्यास । झाला वास त्यामाजि ॥ ३ ॥ तुका ह्मणे रूप ध्यावें । नाहीं ठावे दुर्गुण ॥ ४ ॥

॥ ५२३३ ॥ सान न ह्मणती थोर । दुष्ट नष्ट पापी चोर ॥१॥ सर्व द्यावी एक चवी । तान्ह हरुनी निववी ॥ २ ॥ नेणे कधीं दिसराती । सर्वकळा सर्वांभूतीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे झारी । घेतां तांब्यानें खापरी ॥ ४ ॥

॥ ५२३४ ॥ वेडे वेडे बहुवेडे । चाखी गोडे चवी ना ॥ १ ॥ देहा लावी घाली वात । झाली रात पालवी ॥२ ॥ मुल भोंवतें तें भोये । रडे धाय मोकलूं ॥ ३ ॥ लेंक वित्त पुसे जगा । कोण सांगा साक्ष तें ॥ ४ ॥शुद्धी आपुलिया नाहीं । जाणे कांहीं आणिकां ॥ ५ ॥ तुका ह्मणे ऐसे जन । राखे कोण नरकीं॥ ६ ॥

॥ ५२३५ ॥ भवसिंधु काय कोड । दावी वाट पुढें पुढें ॥ १ ॥ तारूं भला पांडुरंग । पायजी जो नेदी अंग ॥ २ ॥ मागें उतरी बहुत । पैल तिरीं साधु संत ॥ ३ ॥ तुका ह्मणे लागवेगें । जाऊं तयाचिया मागें ॥ ४॥

॥ ५२३६ ॥ मन वोळी मना । बुद्धी बुद्धि क्षण क्षणा ॥ १ ॥ मज राखण मी झालों । ज्यानें तेथें चि धरिलों ॥ २ ॥ जे जे जेथें उठी । ते ते तया हातें खुंटी ॥ ३ ॥ भाजिली स्वजनी । तुका साक्ष तुरे दोन्ही ॥ ४ ॥

॥ ५२३७ ॥ नव्हे करितां जें कांहीं । ध्यातां ध्यायीं तें नव्हे ॥ १ ॥ नव्हे जाणवी जें जनां । वाटे मना तें नव्हे ॥ २ ॥ त्रास मानी जो कंटाळा । व्यर्थ चाळा तें नव्हे ॥ ३ ॥ नव्हे भोंवतें जें भोंवे । नग्न धांवे तें ही नव्हे ॥ ४ ॥ तुका म्हणे एक आहे । सर्वां पाहे सहज ॥ ५ ॥

॥ ५२३८ ॥ एकाचीं उत्तरें । गोड अमृत मधुर ॥ १ ॥ ऐशा देवाच्या विभुती । भिन्न प्रारब्धाची गती ॥ २ ॥ एकाचीं वचनें । कडू असंत तिक्षणें ॥ ३ ॥ प्रकारचे तीन । तुका म्हणे केले जन ॥ ४ ॥

॥ ५२३९ ॥ आपुलें तों कांहीं । येथें सांगिजेसें नाहीं ॥ १ ॥ परी वाणी वायचळे । छंद करवी बरळे ॥ २ ॥ पंच भूतांचा हा मेळा । देह सत्यत्वें निराळा ॥ ३ ॥ तुका म्हणे मुळीं । इच्या उफराट्या चाली ॥ ४ ॥

॥ ५२४० ॥ प्रश्न अक्षराचा केला । फळा आला तेणें तो ॥ १ ॥ तळ सकळांचा धरी । जिवा उरी होईना ॥ २ ॥ लवे फळलें तें भारें । पिक खरें आलें तें ॥३॥ तुका म्हणे घाली उडी । भव फेडी पुढें तें ॥ ४ ॥

॥ ५२४१ ॥ एक भाव चित्तीं । कांहीं न लगे ती चित्तीं ॥ १ ॥ कळों आलें जिवें । मज माझियाचि भावें ॥ २ ॥ आठव चि पुरे । सुख अवघें मोहरें ॥ ३ ॥ तुका म्हणे मन । पूजा इच्छी नारायण ॥ ४ ॥

॥ ५२४२ ॥ इळा घेऊनि जे आले । त्यांसीं तरवार न हाले ॥ १ ॥ नव्हे आपुलें उचित । टाका करोनि फजित ॥ २ ॥ आंगोळिया मोडी । त्यासी काय लिले घोडी ॥ ३ ॥ नपुंसका साठीं । तुका म्हणे ने घे जेठी ॥ ४ ॥

॥ ५२४३ ॥ न्हावी परीट जन्माचे । जात साचे नरकीं ॥ १ ॥ जैसा वखड चचरी । तोंडें करी संवादणी ॥ २ ॥ पूर्वे जन्मीं शिखा सूत्र । मळ मूत्र अंतरीं ॥ ३ ॥ तुका म्हणे करी निंदा । पुढें धंदाधुवट ॥ ४ ॥

॥ ५२४४ ॥ वदें अनुभववाणी । धरा ध्यानीं आपुले ॥ १ ॥ कैंचि चिका दुध चवी । जरी दावी पांढरें ॥ २ ॥ जाती ऐसें दावी रंग । बहु जग या नांव ॥ ३ ॥ तुका म्हणे ते खद्योत । डुंगा त्यांतें आपुल्या ॥ ४ ॥

॥ ५२४५ ॥ न धांवतां घरीं । करी धनाची चाकरी ॥ १ ॥ होय बैसल्या व्यापार । नको सांडावेंचि घर ॥ २ ॥ रानीं वनद्वीपीं । होती आसतीं तीं सोपीं ॥ ३ ॥ तुका म्हणे मोल । देतां कांहीं नव्हे खोल ॥ ४ ॥

॥ ५२४६ ॥ राजद्वारीं ओळंगणें । काय होउनियां सुनें ॥ १ ॥ आंगीं दावी निष्कामता । जाण पोकळी ती वृथा ॥ २ ॥ कासया मोकळें । शिष्टां भोंवतें गाबाळ ॥ ३ ॥ तुका म्हणे ढाळे । बाह्य रंग ते निराळे ॥ ४ ॥

॥ ५२४७ ॥ थोर म्हणतांचि सुख । सर्व पाहतां चि मुर्ख ॥ १ ॥ काय करावें घोकिलें । वेदपाठ वांयां गेले ॥ २ ॥ वेदीं आहे तें न करी । ब्रम्ह नेणे दुराचारी ॥ ३ ॥ तुका देखे जिवीं शिवीं । जाणे तें चि अनुभवीं ॥ ४ ॥

॥ ५२४८ ॥ धर्म वैष्णवांचा खरा । हरीहरा स्मरती ॥ १ ॥ देह लोभ काम क्रोध । गेला भेद नासोनी ॥ २ ॥ शांती सहित ती क्षमा । या अपेक्षा राहिल्या ॥ ३ ॥ तुका म्हणे विष्णुदासां । देव पिसा हिंडत ॥ ४ ॥

॥ ५२४९ ॥ विठोबा सारिखा सांडूनी व्यवहारी । आणिकांची करी आस वांयां ॥ १ ॥ बहुतांसी दिल्हा उद्धार उदारें । निवडीना

खरें खोटें कांहीं ॥ २ ॥ याचिया अंकिता वैकुंठ बंदर । आणिक व्यापार चालती ना ॥ ३ ॥ तुका म्हणे माझें हातींचें वचन । यासी बोल कोण ठेवूं शके ॥ ४ ॥

॥ ५२५० ॥ तीर्थांचिये आसे पंथ नीट देव । पाविजे तो ठाव अंतराय ॥ १ ॥ ह्मणऊनि भले निश्चळचि स्थळीं । मनाचिये मुळीं बैसोनियां ॥ २ ॥ संकल्पा आरूढ प्रारब्धेंचि जिणें । कार्या तें कारण वाढतसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे कामा जिरवितां सुख । नाहीं एक मुख हातें पोटीं ॥ ४ ॥

॥ ५२५१ ॥ मृगजळा ठायीं नाहीं नाहीं जळ । सर्व मिथ्या मूळ माया पाहीं ॥ १ ॥ नाहीं आन माया जग ब्रह्म पाहीं । इंद्रियें सर्वही ज्ञाननादें ॥ २ ॥ दोराचें जिवित्व जितांचि पैं मेले । बंधमुक्त बोलें ब्रह्मीं नाहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे माया चैतन्य चिद्धन । सत्य मिथ्या जाण मुळ सर्व ॥ ४ ॥

॥ ५२५२ ॥ सबळ हे माया नागवे कवणा । भांबाविलें जनां दाही दिशा ॥ १ ॥ आशा तृष्णा दंभ लागलेसे पाठीं । नेंदीं बैसो हाटीं मोहो ठायीं ॥ २ ॥ कामक्रोध घरा लावितील आगी । निंदा हिंसा दोघी पळताती ॥ ३ ॥ लाज पुढें उभी राहिली आडवी । करी ते गाढवी थोर घात ॥ ४ ॥ तुका ह्मणे चिंता बांधी गर्भवासीं । वेढोनियां पाशीं चहुंकडे ॥ ५ ॥

॥ ५२५३ ॥ औषध घेईना असोनियां व्यथा । पथ्य न करितां हानी पावे ॥ १ ॥ संगेंविण करी विदेशगमन । ओळखीवांचोन कोणासंगें ॥ २ ॥ सरळ असतां सुपंथ मारग । व्यर्थ भागाभाग करूं नये ॥ ३ ॥ तुका ह्मणे उडी घाली महापुरीं । मुर्ख निरंतरी हित नेणें ॥ ४ ॥

॥ ५२५४ ॥ सर्वथा नातळे परदाराधन । ऐसें ज्याचें मन मनातीत ॥ १ ॥ ऐसें जयापाशीं दृढ निरंतर । अखंड पवित्र तप ज्याचें ॥ २ ॥ तुका ह्मणे सदा तोचि एक शुचि । नेणे महत्वाचि थोरपण ॥ ३ ॥

॥ ५२५५ ॥ कागदीं लिहितां नांवाची साकर । चाटीतां मधूर केंवि लागे ॥ १ ॥ बोलाचीच कढी बोलाचाचि भात । जेविलिया तृप्त केंवि होय ॥ २ ॥ तुका ह्मणे तैशा शब्दज्ञानगोष्टी । वायां सा चावटी बोलों नये ॥ ३ ॥

॥ ५२५६ ॥ तुझ्या सर्व गोष्टी ऐकतांचि सुख । करितां हें दुःख थोर आहे ॥ १ ॥ तैसी हरीभक्ति सुळावरिल पोळी । निवडे तो बळी शूर

जाणा ॥ २ ॥ पिंड पोशिलिया विषाचे पायक । वैकुंठनायक कैंचा तेथें ॥ ३ ॥ तुका ह्मणे व्हावें देहासी उदार । रुक्मिणीचा वर जोडावया ॥ ४ ॥

॥ ५२५७ ॥ अमृत अंतरीं गेलिया सहज । लखलखी काज काय काम ॥ १ ॥ साधु सज्जनांची तेचि वृत्ति जाण । समान लक्षण आन नाहीं ॥ २ ॥ आत्मज्ञान पूर्ण सर्वां भूतीं अंश । सत्य सदोदित शुद्ध बुद्धि ॥ ३ ॥ तुका ह्मणे मूळ ढाळ नाहीं रूप । जें जें भासे दीप तेंचि ब्रह्म ॥ ४ ॥

॥ ५२५८ ॥ भोळ्या भाविकासी एका भाग्य देतां । भिकेसी लावितां एका मार्गें ॥ १ ॥ कदा काळीं न कळेचि देणें । राव रंक होणें तुज लागे ॥ २ ॥ गर्वाचिया मुळा समुळ निवारी । ऐसा माझा हरी पांडुरंग ॥ ३ ॥ तुका ह्मणे सर्व देवावरी भार । तयाचा विचार तोचि जाणे ॥ ४ ॥

॥ ५२५९ ॥ पांडुरंग कांहीं न धरी संकोच । उभा पंढरीचे विटेवरी ॥ १ ॥ घरा येती देव नव्हती संदेह । फकीराचा येव जेव्हां होय ॥ २ ॥ होई तो सगुण योगी अनुभवें । घडी घडी देव संभाळील ॥ ३ ॥ तुका ह्मणे सर्व देवावरी भार । तयाचा विचार तोचि जाणे ॥ ४ ॥

॥ ५२६० ॥ उबगेसी झाली दिवस रजनी । राहिलों लाजोनी न बोलावें ॥ १ ॥ रुचीविण वांया शब्द काय माप । अनादर कोप येत असे ॥ २ ॥ आपुलिया रडे आपुलेंचि मन । दाटे समाधान सर्वकाळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे आम्ही असों जी जाणते । काय करूं रिते वादावाद ॥ ४ ॥

॥ ५२६१ ॥ अयाचित वृत्ती देवावरी भार । या नांव साचार खरें व्रत ॥ १ ॥ सांभाळितां देव देह यथाकाळीं । योजिलें कपाळीं प्राप्त होतें ॥ २ ॥ विश्वास जतन धीर राहे मन । सदां समाधान आली वेळ ॥ ३ ॥ तेव्हां लाभ असे चिंतन नेमिलें । अलभ्य ठेविलें विश्वंभरें ॥ ४ ॥ तुका ह्मणे बळ अंगीं बरें व्हावें । एकाचि जाणावें व्रत सार ॥ ५ ॥

॥ ५२६२ ॥ कासया संकोच चित्ताचि भोंवता । होय तें बहुतां सुख किजे ॥ १ ॥ देवाचें पूजन भुतांचें पालन । मत्सर तो शिण बहुतांचा ॥२॥ रुसावें फुगावें आपुलियावरी । उरला तो हरी सकळही ॥ ३ ॥ तुका ह्मणे संतपण याचि नांव । जेणें होय जीव सकळांला॥ ४ ॥

॥ ५२६३ ॥ आंधळें तें सांगे सांगितल्या खुणा । अनुभव जाणा प्रगटल्या ॥ १ ॥ नांदणूक सांगे वडिलांचें बळ । कैसा तो दुर्बळ सुख पावे ॥ २ ॥ तुका ह्मणे नांदे आपुल्या प्रतापें । तयाची लोकांपें स्तुती सांगे॥३॥

॥ ५२६४ ॥ सुगंध ह्मणोनी चोळूं नये फुल । खावूं नये मूल आव-
डतें ॥ १ ॥ मोतियाचें पाणी चाखूं नये स्वाद । यंत्र भेद नाद पाहूं नये
॥ २ ॥ मर्कट ह्मणोनी इच्छुं नये काम । तुका म्हणे वर्म दावूं नये ॥ ४ ॥

॥ ५२६५ ॥ देवाचें गौरव न कळे पाठका । अधिकार लोकां नाहीं
येर ॥ १ ॥ विठोबाचें नाम सुलभ सोपार । तारी एकसर भवसिंधु ॥ २ ॥
जाण सा असाध्य मंत्रतंत्रकळा । येर सा सकळां मुढलोकां ॥ ३ ॥ तुका
ह्मणे विधीनिषेध लोपला । उच्छेद या झाला मारगाचा ॥ ४ ॥

॥ ५२६६ ॥ नये दंतकथा येथें सांगूं कोणी । कोरडे ते मानी कोण
बोल ॥ १ ॥ अनुभव येथें पाहिजे साचार । न चलती चार आह्मापुढें ॥२॥
वरी कोण मानी रसाळ बोलणें । नाहीं ज्याणें मनें ओळखिलीं ॥ ३ ॥
निवडी वेगळें दुध आणि पाणी । राजहंस दोन्ही वेगळालीं ॥ ४ ॥ तुका
म्हणे येथें पाहिजे जातीचे । येर गव्हाराचें काम नाहीं ॥ ५ ॥

॥ ५२६७ ॥ मोक्षा जावयास हेत उपजेल । तरीच भेटेल सद्गुरु तो
॥ १ ॥ मग हो कां भलतैसा साधु कोणी । त्याचिया चरणीं भाव बैसे ॥२॥
क्षुधा असलिया भलतैसें कांहीं । गोड लागे पाही तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ५२६८ ॥ कोणी नव्हत कोणाचे । अवघे संबंधी देहाचे ॥ १ ॥
देह चाले हा जंवरी । तंव सोयरीं धायरीं ॥ २ ॥ अंतीं न येती कामासी ।
विचारिती द्रव्यराशी ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरिचें नाम । गातां होय पूर्ण
काम ॥ ४ ॥

॥ ५२६९ ॥ मायबाप आणि बंधु हे सोयरे । चोर हे खाणोरे दुःख
दायी ॥ १ ॥ पदरीं असे धन तंववरी सारीं । नसतां मग दूरी सांडतील
॥ २ ॥ हरीनाम गातां साधू तो भेटेल । विश्रांती होईल सुख मोठें ॥ ३ ॥
तुका ह्मणे आह्मी संताचे ते दास । आवडूं विठोबास सर्व भावें ॥ ४ ॥

॥ ५२७० ॥ मायबाप बंधू सोईरे श्रीहरी । माझा सुखकारी पांडुरंग
॥ १ ॥ मायबाप काळा हातीं ओगरतीं । विठो काळाप्रती पाहों नेदी ॥२॥
॥ २ ॥ जन्मवरी आह्मी हरीनाम गावें । वडीलें भुलावें वेव्हारासी ॥ ३ ॥
हरिकथा करितां सोयरे हांसती । संत संतोषती तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ ५२७१ ॥ बाइलेमुळें होय भजनाचा घात । तिच्या हातीं हात ग-
ुसला ॥ १ ॥ संसार मायेचा करावा तो कोणी । मावेची ते खाणी मूळ

नारी ॥ २ ॥ सर्व सांडोनिया हरीनाम गावें । तुका ह्मणे व्हावें जिवन्मुक्त ॥ ३ ॥

॥ ५२७२ ॥ ज्याचा जैसा ध्यास तैसें त्याचें मन । तयास पुराण काय होय ॥ १ ॥ नपुंसकाचें तें ध्यान क्लीबपण । तयास पद्मिण काय करी ॥२॥ मायबाप ज्याला पोर मुकें जाण । त्यासी वेदाध्ययन कैसें सांगे ॥ ३ ॥ तुका ह्मणे जरी गुरुकृपा वसे । तरीच हा बसे स्वस्थ ठायीं ॥ ४ ॥

॥ ५२७३ ॥ आइकाया वाटे ब्रह्मज्ञान गोड । परी अवघड एक दिसे ॥ १ ॥ नाशिवंत देह-ठेवी लपवून । मागे मग ज्ञान गुरुपाशीं ॥ २ ॥ मनाचा तो मळ आधीं धुउनी घ्यावा । तीर्थप्रसाद ठेवा शेष कांहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुळसी निर्माल्य विठोबाचा । भक्षी तोचि साचा हरिदास ॥ ४ ॥

॥ ५२७४ ॥ उदार तरी देऊं गांडीची लंगोटी । कुटिलाच्या काठी नाकीं देऊं ॥ १ ॥ भले तरी आह्मी जगासी दाखऊं । दुर्जनासी होऊं काळ तैसे ॥ २ ॥ भल्याचिया आह्मी कुटुंबास तारूं । निंदकाचा संसारु पहावेना ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मा दया येते कांहीं । ह्मणोनियां कांहीं बोलतसें ॥ ४ ॥

॥ ५२७५ ॥ ह्मणवितां भलें संताचा सेवक । आइत्याची भीक सुखरूप ॥१॥ ठसावतां बहु लागती प्रयास । चुकल्या घडे नाश अल्प वर्म ॥२॥ पाक सिद्धी लागे संचित आइतें । घडतां साइतें तेव्हां गोड ॥ ३ ॥ तुका ह्मणे बऱ्या सांगतांचि गोष्टी । रणभूमी दृष्टी न पडे तों ॥ ४ ॥

॥ ५२७६ ॥ आलें तेव्हां तेंचि राहिलें पिकोन । जरी तें जतन होय देंठी ॥ १ ॥ नामेंचि सिद्धी नामेंचि सिद्धी । व्यभिचार बुद्धी न पावतां ॥ २ ॥ चालिला पंथ तो पावला त्या ठाया । जरी आड तया कांहीं नये ॥३॥ तुका ह्मणे मध्यें पडती आघात । तेणें होय घात हाणी लाभ ॥ ४ ॥

॥ ५२७७ ॥ धन्य त्याची माता धन्य त्याचें कूळ । जयासी गोपाळ आवडे मनीं ॥ १ ॥ धन्य त्याचा देश धन्य त्याचें गांव । जया पंढरीराव आवडे मनीं ॥ २ ॥ धन्य ते भुमीका धन्य त्याचें घर । वैकुंठीची धूर सखा केला ॥ ३ ॥ तुका ह्मणे धन्य तयाची संगती । ज्या मेळीं श्रीपती खेळे सदां ॥ ४ ॥

॥ ५२७८ ॥ वृंदावन फळें घोळिली शर्करा । भितरील थारा न मोडेची ॥ १ ॥ तैसे दुर्जनाचे न जाती दुर्गुण । स्वभाव कठीण ह्मणोनि-

यां ॥ २ ॥ पाषाण न विरे भिजतां सागरीं ॥ काग गंगातीरीं न्हाती काय ॥ ३ ॥ तुका ह्मणे केली कारळ्याची खीर । घालीतां साखर कडू वाटे ॥ ॥ ४ ॥

॥ ५२७९ ॥ सुवर्णाचें ताट खिरीनें वोगरिलें। भक्षावया दिलें गर्दभासी ॥ १ ॥ वेदपारायण बधिरा सांगे ज्ञान । तयाची ते खूण काय सांगे ॥ २ ॥ मुक्ताफळहार मर्कटांच्या गळां । कस्तुरी शूकरा चोजविली ॥ ३ ॥ तुका ह्मणे ज्याचें तोचि जाणे वर्म । भक्तीचें माहिमान साधु जाणे ॥ ४ ॥

॥ ५२८० ॥ आधीं नरतनु जन्म ही ब्राह्मण । त्याही वरी जाण ब्रह्मज्ञानी ॥ १ ॥ आधींच सोन्याचें वरी जडावाचें । लेणें श्रीमंताचें शोभिवंत ॥ २ ॥ ऐसें जया घडे धन्य तोचि एक । वैकुंठनायक ह्मणति तया ॥ ३ ॥ तुका ह्मणे दैवें असती चोखट । तरीच घडती स्पष्ट चारी गोष्टी ॥ ४ ॥

॥ ५२८१ ॥ विंचू हाणी नांगी । दुःख आणिकांचे अंगीं ॥ १ ॥ काय लाधला दुर्जन । तोंडावरी थुंके जन ॥ २ ॥ सर्प जावोनि दंशावें । तेणें प्राणासी मुकावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐशा जाती । नरकीं राहोनी पचती ॥ ४ ॥

॥ ५२८२ ॥ ज्याचा सखा हरी । त्यावर विश्व कृपा करी ॥ १ ॥ ऐसा असोनी अनुभव । कासाविस होतो जीव ॥ २ ॥ ज्यास हरीचें चिंतन । त्यासीं बांधुं न शके विघ्न ॥ ३ ॥ तुका म्हणे हरी । प्रल्हादासी यत्न करी ॥ ४ ॥

॥ ५२८३ ॥ बहुत प्रकार परी ते गव्हाचे । जिव्हे जिव्हानाचे आवडी ते ॥ १ ॥ सरली ती आवडी दुसरी ही नवी । सिंधु सदा दावी तरंग तें ॥ २ ॥ घेतलें ते द्यावें आम्ही वेळोवेळां । माय बाप लळा न विसंबे ॥ ३ ॥ तुका ह्मणे रस राहीला वचनीं । तो पडताळूनि ठेवितसें ॥ ४ ॥

॥ ५२८४ ॥ शुद्ध मंगळाचा सांठा । विट तोटा नेणत ॥ १ ॥ हाचि भरंवसा आला । भला भला ह्मणवी ॥ २ ॥ जनीं जनार्दन वसे । तेथें दिसे तें शुद्ध ॥ ३ ॥ तुका ह्मणे बहु सुखें । खरें सुखें ठेवावें ॥ ४ ॥

॥ ५२८५ ॥ जैसा शुद्ध गंगा ओघ । तैसा भाग वागवी ॥ १ ॥ प्रेम वाढे ग्रासोग्रासीं । ब्रह्मरसीं भोजन ॥ २ ॥ तृप्तीवरी आस्था उरे । ऐसे बरे प्रकार ॥ ३ ॥ तुका ह्मणे पाक मन । नारायण ते भोगी ॥ ४ ॥

॥ ५२८६ ॥ मुळव्याधी जो पिडीला । त्यासी हांसे तो खर्जुला ॥ १॥ ह्मणे राम राम । त्यासी निंदिती अधम ॥ २ ॥ तीर्थी करी सोसी । त्यासी हांसतो आळसी ॥ ३ ॥ क्षयरोगी ह्मणे सत्ता । सरे रोगी अरोग्यता ॥ ४ ॥ डोळां वडस वाढलें । काक कान्हेळा अबोलें ॥ ५ ॥ तुका ह्मणे पाया । शुद्ध होय आपणीया ॥ ६ ॥

॥ ५२८७ ॥ असे कारण तें दृष्टी । शंका पोटीं उपजे ॥ १ ॥ शूर शोभे रणांगणीं । मरणींच संतोष ॥ २ ॥ पाहिजे तो कळवळा । मग बाळा उणें त्या ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐशा लीळा । पाहूं कवतुकें डोळां ॥ ४ ॥

॥ ५२८८ ॥ सर्व साधियलें कर्म । स्नानसंध्या नित्य नेम ॥ १ ॥ जे जे आश्रमाचे धर्म । नित्यानित्य उपक्रम ॥ २ ॥ क्रिया झाली सांग । दिलें गंगोदक अर्घ्य ॥ ३ ॥ तुका ह्मणे नेम । आणावे साठीं श्रम ॥ ४ ॥

॥ ५२८९ ॥ देखण्याच्या तीन जाती । वेठी वारता अत्यंतीं ॥ १ ॥ जैसा भाव तैसें फळ । खाती तोचि एक जाळ ॥ २ ॥ पाहे सांगे आणि जेवी । शुद्ध बुद्ध लाभ जेंवीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे हिरा । मुर्खें पारखिया गारा ॥ ४ ॥

॥ ५२९० ॥ घेती एकासी थडका । पाडी धका देऊनी ॥ १ ॥ एकमेकां पाठीवरी । स्वयें करी टवाळी ॥ २ ॥ हाता हात हाणी बाही । चुके ठायीं पडतां ॥ ३ ॥ तुका लवणीचे पणीं । एका हाणी पोटासी ॥ ४ ॥

॥ ५२९१ ॥ शुद्ध दिलें नवनीत । संचित तें भोगीत ॥ १ ॥ आतां पुढें भाव सार । पहा थार जिवना ॥ २ ॥ पडे पारखीया हातीं । चांचपती आगळी ॥ ३ ॥ तुका ह्मणे सेवन ही घडे । त्यासी जोडी लाभ हा ॥ ४ ॥

॥ ५२९२ ॥ नांदे भुताचिये जिवीं । गोसांवीच सकळ ॥ १ ॥ क्षण क्षणा जागा ठायीं । नाहीं कांहीं विश्वास ॥ २ ॥ दाउनियां सोंग दुजें । वसे बीज अंतरीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे धर्म । धरी वर्म चिंतन ॥ ४ ॥

॥ ५२९३ ॥ नर उपजोनी मरे । परी वाटे हेंचि बरें ॥ १ ॥ नाहीं आवडीसी पार । झाले न म्हणावे फार ॥ २ ॥ अमृताची खाणी । नव्हे उघडली धणी ॥ ३ ॥ तुका ह्मणे पचे । मुखा विठ्ठल हें साचें ॥ ४ ॥

॥ ५२९४ ॥ माझा देह वित्त घर । नव्हे खरें जो मानी ॥ १ ॥ माझी प्रिया पुत्र पौत्र । कुळगोत्र सारिखें ॥ २ ॥ जनीं राहोनी निराळा । अग्नि विटाळा नेणे ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याची कीर्ति । दया वसे सर्वां भूतीं ॥४॥

॥ ५२९५ ॥ ज्याचें निर्मळ अंतर । तेथें राहे विश्वंभर ॥ १ ॥ जया नाहीं जोडा दुजा । तेथें राहे स्वामी माझा ॥ २ ॥ निर्मत्सर अंतरींचा । चतुर्भुज सदा वाचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसे रिती । भगवतीं ते सरती ॥ ४ ॥

॥ ५२९६ ॥ आपुलिया पोटासाठीं । करीतो काचिया गोष्टी ॥ १ ॥ जेणें घातलें संसारीं । तोचि विसरला हरी ॥ २ ॥ कोठील मी कोण । ज्याला न कळती गुण ॥ ३ ॥ पोटा घातलिया अन्न । ह्मणे पतितपावन ॥ ४ ॥ तुका ह्मणे नरस्तुती । करी भाट त्रिजगतीं ॥ ५ ॥

॥ ५२९७ ॥ समचरणाची शोभा । तो हा रुक्मिणीवल्लभा ॥ १ ॥ वेद शास्त्राचें माहेर । केला दासां उपकार ॥ २ ॥ नामापाशीं वसे मुक्ति । पहा हृदयीं प्रचिती ॥३॥ तुका म्हणे ज्याची । कळा सकळ अंगींची ॥ ४ ॥

॥ ५२९८ ॥ मज पुसों येती । देव दावा मजप्रती ॥ १ ॥ हेंचि वाटतें नवल । काय करावे ते बोल ॥ २ ॥ दिलें हातीं सांडी । नेघे करविलें गोडी ॥ ३ ॥ सांगितली एकादशी । नाम गावें अहर्निशी ॥ ४ ॥ तुका म्हणे या निश्चयें । त्याचें कार्य सिद्धी जाय ॥ ५ ॥

॥ ५२९९ ॥ चरणींच्या गंगा । तारूं प्रगटलें जगा ॥ १ ॥ ब्रह्माचे पूजनीं । ब्रह्मकटाहाचें पाणी ॥ २ ॥ झालें तिसी नाम देख । तिहीं लोकांसी तारक ॥ ३ ॥ तुका ह्मणे भागिरथी । गंगातिरीं भोगावती ॥ ४ ॥

॥ ५३०० ॥ काय इंद्रियासी नेम ॥ नाहीं मुखीं रामनाम ॥ १ ॥ अन्नामाजीं बोळे माशी ॥ सुख कैचें भोजनासी ॥ २ ॥ ऐसें कीर्तन करावें ॥ जीव वेंचुनीयां भावें ॥३॥ देहीं नाहीं देहभान ॥ अंगीं सगुणाचें ध्यान ॥४॥ तुका ह्मणे साधुसंतां ॥ धन्य होणें हें जेवितां ॥ ५ ॥

॥ ५३०१ ॥ धन्य धन्य तोचि प्राणी ॥ रामनाम जपे वाणी ॥१॥ तोचि एक भाग्यवंत ॥ तयापाशीं रघुनाथ ॥ २ ॥ तेणें तारियलें कुळा । तोचि दैवानें आगळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे धन्य धन्य । त्याचे भेटी थोर पुण्य ॥ ४ ॥

॥ ५३०२ ॥ वाचे जातो वक्ता । ज्याची माझे ठायीं सत्ता १ ॥ न बोलवी अनुचित । वसे देहीं अखंडित ॥ २ ॥ जाणे जो ठायींचें । न सांगतां अंतरींचें ॥ ३ ॥ तुका म्हणे ऐसा । तुह्मी माना भरंवसा ॥ ४ ॥

॥ ५३०३ ॥ आह्मी झालों येणें सुखी । तें या लोकीं दाविलें ॥ १ ॥ परब्रह्मींचा हा ठेवा । नामें जिवा विश्रांती ॥ २ ॥ नाहीं सांगावया कांहीं ॥ उरे पाहीं वेगळें ॥ ३ ॥ तुका ह्मणे उठाउठी । घेतों भेटी देवाची ॥ ४ ॥

॥ ५३०४ ॥ शाहाणिया पुरे । खूण एकाचि उत्तरें ॥ १ ॥ मुर्खालागीं वेळोवेळीं । वाचा शिणवी बरळी ॥ २ ॥ नाहीं सांगावें लागत । कळे सकळ वृत्तांत ॥ ३ ॥ तुका ह्मणे खुणें । खरें अंतरींचें जाणे ॥ ४ ॥

॥ ५३०५ ॥ परिमळ उपचार । देहसार श्रृंगार ॥ १ ॥ तैसे जाणा साधुजन । मुखीं वाण नामाचें ॥ २ ॥ धाले जोविलिया दिसे । दास तैसे विष्णुचे ॥ ३ ॥ तुका ह्मणे वेदश्रुती । नित्य गाती पुराणें ॥ ४ ॥

॥ ५३०६ ॥ हरिभक्तीं घ्यावें नाम । देणें देवाचें हें प्रेम ॥ १ ॥ जोडी करावी जतन । निज अविनाश धन ॥ २ ॥ भय न धरीं मानसीं । येणें नाहीं गर्भवासीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे हेचि । वृत्ती मिरासी साधूची ॥ ४ ॥

॥ ५३०७ ॥ अशा उच्छिष्ट कवळी । मत्स्य देव झाले जळीं ॥ १ ॥ लाग बैसली पुढारां । नागविलें थोरथोरां ॥ २ ॥ पिटी हांसोनियां करीं । हात पुसा ह्मणे टिरी ॥ ३ ॥ जाणे अंतर सबाहीं । येथें अभिमान नाहीं ॥ ४॥ केले तर्क हे उपाय । खोटे निवडी संदेह ॥ ५ ॥ तुका ह्मणे खरें खरें । दास ह्मणवितां बरें ॥ ६ ॥

॥ ५३०८ ॥ भक्तिभाग्य प्रेमसुख । नेणे दुःख दुसरें ॥ १ ॥ अनिष्ट हरीपायीं । ठेवी डोयी चरणीं ॥ २ ॥ याजमध्यें सर्वकाळ । हें मंगळ संसारी ॥ ३ ॥ तुका ह्मणे भावबळ । नाहीं काळ चिंतनीं ॥ ४ ॥

॥ ५३०९ ॥ चुकवितें वाट । पुढें सांपडलें नीट ॥ १ ॥ याजसाठीं गर्भवास । नेणें हरीचा हा दास ॥ २ ॥ संचिताचा संग। नावे जाणोनियां भंग ॥ ३ ॥तुका ह्मणे दृष्टी । नव्हे उघडितां कष्टी ॥ ४ ॥

॥ ५३१० ॥ आडरानें भरे जन ॥ क्लेश शिण पावती ॥ १ ॥ नीठ लाउनियां मार्गीं ॥ संतसंगीं सत्कर्मीं ॥ २ ॥ मूढ दोषी पापी जन ॥ संगें जाण उदार ॥ ३ ॥ तुका ह्मणे धर्मशील ॥ हे दयाळ सद्भक्त ॥ ४ ॥